
## कथास्पर्धा : उत्तेजनार्थ तृतीय क्रमांक

# प्लास्टिक संपेल ?

**राघवेंद्र श्रीकृष्ण वंजारी**



**- एक -**

**ज्ये**ष्ठातल्या सकाळचा पहिला प्रहर होता. दामोदरने देवाला नमस्कार करून गंध माथी लावला. शाम घराबाहेर आपल्या जुनाट सायकलवरची धूळ पुसत आजच्या दिवसाची सुरुवात करतो. दामोदर सायकलच्या हॅन्डलला कुऱ्हाड अडकवून स्टॅन्डला पाय मारतो, तितक्यात आतून सुमित्रा आवाज देते.

''आवं येताना जळन आणा, अन् आज ते आपिसातले लोक येणार हाय ना ?''

''व्हय व्हय येतो दुपार पतूर.'' दामोदर पत्नीस उत्तरला आणि नित्य परिपाठाप्रमाणे तो आणि शाम शेताकडे निघाले. कड्कड् कड्कड् कड्कड् असा आवाज करत सायकल निघाली. कॅरियरवर बसलेला शाम सीटला धरून रस्त्याच्या वळणानुसार हालू लागला.

''लाईट हाय तवर पटकन पान्याचं अन् कापनीचं काम उरकून घीऊ.'' दामोदर शामला म्हणाला. ''बरं गा.'' शांत आवाजात शामाने होकार दिला.

सायकलने रस्त्यावरून उतरून आता पायवाट धरली.

शामचे लक्ष भवताली होते. झाडाच्या घोळक्यातून त्याचं लक्ष एका बोरीच्या झाडावरच्या मधमाशाच्या मोहोळावर गेले. तो बाबांना म्हणाला, ''बा, मधाचं पोळ लागलंय बोरीवर, काढून दी कि मला.''

''आरं, पैला काम संपुदे मग बघू ती. तू ती बियाची पिशवी आनला ना ?''

''कुंची ?''

दामोदरने कचकन ब्रेक दाबला. सायकल थांबवली. दोघेही उतरले.

''आरं शामू काल मी आनलेली पिशवी संगुट घी म्हनलं न्हवतं तुला ?अन मधाच पोळ फायजी म्हन.'' प्रश्नार्थक बाबांनी कामाची विचारणा केली आणि मधाच्या मागणीची चवच बदलली.

''हि घी सायकल अन घरनं घिवून ये जा.'' वरच्या पट्टीतल्या आवाजात दामोदरने सांगितले. शामने मान हलवली आणि सायकल वळवली. सायकलच्या आडव्या सळयीखालून पाय टाकला आणि घराकडे चालता झाला.

''लगीच ये बर'' जाता जाता दामोदरने निरोप दिला.

दामोदरचं लक्ष बोराच्या झाडाकडे गेले. झाडात गडद रंगाचं एक मधमाशाचं पोळं लागले होते. त्याला पाहून दामोदरने स्मित हास्य केले. तो पायीपायी शेताकडे निघाला.

शेतात कामाला सुरुवात झाली. शाम बाबांच्या कामात मदत करू लागला. उन्हं तापू लागली. वीज गेली तशी कामे आटोपशीर झाली. दामोदर म्हणाला, ''एक चार बिया उरवून समद्या राखत कालीव अन रांजनात टाक अन् चल.''


बियाणं ठेवेपर्यंत दामोदरने जळणाची मोळी सायकलला लावली. कुऱ्हाड पुन्हा हॅन्डलला अडकवून सायकल ढकलत दोघे निघाले. वाटेत पुन्हा बोरीचं झाड दिसले. शामला पुन्हा मधाचा मोह झाला. तो झाडावरच्या मोहोळाकडे खुणावत बाबांना म्हणाला, ''बा ! मध काढून दी कि ?''

''काय रं तुझ उन्हातान्हाचं ! चल, परत बघू.''

''नकु मला आत्ता फायजी'' शामने हट्ट धरला.

दामोदरने सायकलला स्टॅन्ड मारले. हॅन्डलची कुऱ्हाड काढून झाडाकडे पाहिले. शाम कुतूहलाने पाहत होता. झाडाला काटे असल्यामुळे दामोदरने मागच्या बाजूने काढण्याची योजना केली. झाडावर चढणे अशक्य होते. कुऱ्हाडीच्या मदतीने मोहोळाचा फाटा वाकवला आणि पूर्ण फांदीच झाडापासून वेगळी केली.

''थांब जरा, माशा उडून जाऊदे मग घी, घरी



जाऊन खा.'' दामोदरने मुलाला सांगितले.

थेंब थेंब मध सांडत असलेले पाहून दामोदरने त्याला सुचवले, ''त्या चार बिया खिश्यात ठिव अन् पुळी त्या पिशवीत ठिव.'' सांगितल्याप्रमाणे शामने केले आणि दोघे घरी पोहोचले.

## - दोन -

बापलेक घरी पोहोचताच खरे.... तितक्यात कृषी विभागाची गाडी घरासमोर येऊन थांबली. त्यामधून आलेल्या बाईंनी घरात हाक दिली, ''सुमित्राकाकू, आहात का घरात ? काका नमस्कार.''

''याकी बाई या या'' दामोदरचा आतून आवाज आला.

''आवं, आपिसातल्या शारदाबाई आल्यात.''

''व्हय व्हय'' म्हणत दामोदर बाहेर आला.

''नमस्कार नमस्कार बाई. येवढ्या उन्हात येनं केलं ? काय नवी योजना बिजना आली का काय ? ''

''नाही ओ काका, योजना नाही. तेच नेहमीचंच काम, बियाणांचा हालहवाल बघायला आले होते.''

''बर बर बसाकी.'' दामोदरने बाईंचे स्वागत केले.

''ये बाईंना चहापाण्याच बघ की.'' दामोदरने आपल्या बायकोला हुकूम केला.

''व्हय'' म्हणून सुमित्रा स्वयंपाक खोलीत गेली.

बोलता बोलता बाईंचं लक्ष शामकडे गेले आणि त्या म्हणाल्या, ''काय बाळ काय करतोस ?''

शाम बियांच्या पिशवीतून मधाची पोळी काढण्यात व्यस्त होता. पिशवीतून मध गळत होते. त्याच्या हाताला लागलेले मध जसे तसे तो चाखत होता. शारदा आणि दामोदर त्या पिशवीकडेच पाहत होते. प्लास्टिकच्या पिशवीतून मध गळून सारी पिशवी माखली होती. त्याला असंख्य छिद्रे पडली होती त्यातून मध बाहेर येत होते. मधामध्ये आणि पोळ्यामध्ये अनेक आळ्या असल्याचे शारदाने पाहिलं आणि म्हणाली, ''नको खाऊस खराब झालंय ते.''

हे ऐकून शामचा चेहरा पडला.

दामोदर म्हणाले, ''चांगलं नसलं तर दि टाकून.''

शारदाने ती पोळी पिशवीसह निहारली. त्यामध्ये कीटकांचे लहानसहान अवयव, बारीक पंखांचा तुकडा दिसून आला. मृत मधमाशीसुद्धा होती; पण ती पोळी अर्धी मधाने भरलेली होती आणि अर्धी कुरतडलेली होती. शारदाला हे थोडं विचित्र वाटलं. तिने बियाणासोबत या मधाच्या मोहोळाचीसुद्धा विचारपूस केली. दामोदरने बियाणे, पेरणी, पिकांची व बाजारभावाची स्थिती शारदाबाईंना सविस्तर सांगितली. मधाची सारी हकीगतसुद्धा बाईंना सांगितली. शारदा कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी असल्याने या भागात वारंवार यायच्या. इथल्या पर्यावरणाचा तिला चांगला परिचय होता. ती कीटकशास्त्र विषयात प्राविण्य मिळवून कृषी विद्यापीठातली अभ्यासक होती. तिने शामला पिशवी घेऊन जाण्याचे विचारले. शामने ते नाकारले. बाईंनी त्या बदल्यात चॉकलेट दिले; पण त्याने मधाचा हट्ट धरला. त्यावर दामोदरने शामला समजावले व बाईंना पिशवीसह मोहोळ देण्यास मनावले.

## - तीन -

शामकडून मोहोळ आणल्यापासून वेगवेगळे तर्क, अंदाज शारदाच्या मनात येत होते. त्याबद्दल अधिकचे अध्ययन करणे गरजेचे असल्याचे तिला समजले होते. शारदाने ते नमुने प्रयोगशाळेत व्यवस्थित ठेवले. त्यांना इजा न होता वेगवेगळे केले. पिशवीवर असणारा प्रत्येक नमुना रसायनाच्या साहाय्याने स्वच्छ

केला. त्या नमुन्यांना काचपट्टीवर घेऊन सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने पाहू लागली. प्रत्येक नमुन्यांचे पृथ्थकरण केले. त्यामध्ये किटकाच्या पंखाचे तुकडे दिसून आले. आळ्यांची शरीररचना आणि पंखांचे तुकडे यावरून समजले की, मोठ्या संख्येत असणाऱ्या आळ्या पतंगाच्या आहेत. नेमकी कोणती प्रजाती असावी ? हा पुढचा प्रश्न तिच्यासमोर ठाकला.

अवस्थांतर हा कीटकांचा गुणधर्मच आहे. यामुळे तिने एक युक्ती केली. त्या आळ्यांचं संगोपन केलं. त्यांना पोषक असं वातावरण प्रयोगशाळेत तयार करून वाढवले. आठवडाभराच्या प्रतीक्षेनंतर आळ्यांचे रूपांतर पतंगात झाले. ती प्रजाती 'इंडिअन मील मॉथ प्लोडिया इंटरपंक्टेला' ही असल्याची ओळख पटली. प्लास्टिक पिशवीला पडलेल्या छिद्रांचे तिने लक्षपूर्वक निरीक्षण केले. ती छिद्रे झाडावरची आळी जशी हिरवी पाने कुरतडते त्यासारखी होती.

शारदाला एक घटना सतत अस्वस्थ करत होती. बियांची पिशवी मधाची पोळी भरताना चांगली होती, घरी येईपर्यंत त्यातून मध गळू लागलं. कदाचित या पतंगीच्या आळ्यांनी तर ते प्लास्टिक कव्हर कुरतडलं असेल का ? याची पडताळणी करण्यासाठी प्रयोगशाळेत नियंत्रित स्थितीमध्ये एक छोटासा; परंतु गमतीदार प्रयोग करायचं तिने ठरवले. त्याच बियांची दुसरी पिशवी घेऊन त्यात इंडिअन मील मॉथ पतंगीच्या आळ्या सोडल्या. पिशवी दोरीने बंद करून ठेवले. त्या दिवशीचे कार्यालयीन काम उरकून ती घरी परतली.

प्रयोगाची कुतूहलता शिगेस होती. दुसऱ्या दिवशी कार्यालयात पोहोचताच शारदाने थेट प्रयोगशाळेत धाव घेतली. तिने पाहिले की, आळ्यांनी पिशवीला ठिकठिकाणी कुरतडले होते. त्याची चाळण झाली होती. काही आळ्या जमिनीवर पडल्या होत्या, तर काही आळ्या पिशवीच्या वरच्या भागात हालचाल करत होत्या. अजूनही अनेक आळ्या पिशवीला कुरतडत होत्या. एक अधोरेखित करणारी गोष्ट शारदाने त्या दिवशी नमूद केली ती म्हणजे, प्लास्टिक पिशवीचा बराच भाग आळ्यांनी खाल्ला होता.

शारदाने हाच प्रयोग पुन्हा पुन्हा करण्याचा विचार केला; पण वेगळ्या स्वरूपात. दुसऱ्या वेळेस प्रयोगाची जागा बदलली. प्रयोगशाळेऐवजी बाहेरच्या वातावरणात करण्याचे योजिले. इंडिअन मील मॉथ पतंगीच्या आळ्या उकिरड्यावर सोडल्या. दुसऱ्या दिवशी त्याच वेळेला त्याच ठिकाणी येऊन पाहिले असता तेच चित्र निदर्शनास आले. आळ्यांनी विखुरलेल्या प्लास्टिक वेस्टनांना ठिकठिकाणी कुरतडले होते. प्लास्टिक पिशव्यांची चाळण झालेली. काही आळ्या अजूनही अनेक प्लास्टिक कुरतडत होत्या. पुन्हा सारखीच निरीक्षणे मिळाल्यावर प्रयोगाची खात्री पटली. आळ्यांनी प्लास्टिक खाल्ले होते. प्लास्टिकचे विघटन होताना आढळले.

## - चार -

शारदा कृषी अधिकारी तर होतीच; परंतु तिच्या अंतरंगातली संशोधिका कीटकांच्या या वागणुकीबद्दल सातत्याने चिंतनात ठेवत असत. तिने अहोरात्र या किड्यांबद्दल अभ्यास सुरू ठेवला. यापूर्वी या कीटकांवर अश्या पद्धतीचे अध्ययन झाल्याचं तपासून पाहत होती. जगभरातून लिहिलेल्या शोधनिबंधांचे, पुस्तकांचे, अहवालाचे वाचन केले. स्वतःच्या प्रयोगाची निरीक्षणे तऱ्हेतऱ्हेने घेऊ लागली. इतर अभ्यासासोबत त्यांची तुलना करून पाहत असे. त्यांच्यातील साधर्म्य आणि वैधर्म्य घटकांची नोंदणी ती स्वतंत्रपणे करायची. संख्याशास्त्राच्या मदतीने आपले भाकीत पुराव्यासह जोडू लागली. अनेकवार तिने पडताळणी करून आपले संशोधन पद्धतशीरपणे रचले.

हे शोध लोकापर्यंत पोहोचावे या हेतूने, लंडन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेला पाठविले.

शारदाचा शोधनिबंध परिषदेमध्ये चर्चेला ठेवण्याचे निर्धारित झाले. तिला ही गोष्ट समजताच खूप आनंद झाला. अर्थात तिच्यावर एक मोठी जबाबदारी होती कारण कीटकशास्त्रातल्या तज्ज्ञांसमोर आपलं मत मांडता येणार होते. चर्चा करता येणार होती.

**- पाच -**

लंडन शहरातील निसर्ग इतिहास संग्रहालयामधील सभागृहात परिषद भरली. जगभरातून आलेली शास्त्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि पत्रकार मंडळी जमली. नियोजित वेळेप्रमाणे परिषदेला सुरुवात झाली. शारदा पूर्ण तयारीने आली होती. संयोजकाने शारदाला आपला शोध सादर करण्यास आमंत्रित केले. शारदाने आपले सादरीकरण सुरू केले. अर्थात ते इंग्रजीत होते. सादरीकरणाचे शीर्षक होते 'प्लास्टिक संपेल ?' शारदाच्या आवाजात कमालीचा आत्मविश्वास होता. सारे दर्शक गांभीर्याने समोरची चित्रे पाहत होते. सादरीकरणाचा आशय आणि विषय जगाला सतावत असणाऱ्या गंभीर समस्येवर कायमचा तोडगा काढण्यावर होते. वीस मिनिटांच्या कालावधीत शारदाने अगदी कुशलतेने प्रयोगाचे तंत्र, निरीक्षणे, आकडेवारी आणि अनुमान मांडले. शारदाचे बोलणे थांबल्यावर टाळ्यांचा कडकडाट सबंध सभागृहात गाजला. श्रोत्यांनी उभे राहून या संशोधनाची वाह वाह केली. सादरीकरणानंतर चर्चेसाठी वेळ खुला झाला आणि श्रोत्यांमधून प्रश्न येऊ लागले.

एका श्रोत्याने विचारले, "याप्रमाणे पर्यावरणात मोकाट पसरलेल्या प्लास्टिकचा नायनाट करण्यासाठी साधारण किती वेळ लागू शकेल ?"

शारदाने त्याचे उत्तर दिले, "हे पूर्णपणे त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर अवलंबून आहे. कारण ते जितक्या कटाक्षाने आणि नियंत्रणात हे अमलात आणतील तितक्या लवकर मोकाट प्लास्टिक संपवता येईल."

दुसऱ्या श्रोत्याने विचारले, "आता सध्या जी जमीन प्लास्टिकच्या प्रदूषणाने नापीक झाली आहे त्याला या पद्धतीने पुन्हा सुपीक करता येईल का ?"

शारदा त्यावर म्हणाली, "काही अंशी होऊ शकते. संपूर्णपणे होणे कठीण आहे, कारण खूप वेळ जर प्लास्टिक मातीत पडून असेल तर इतर रसायनांची त्यावर अभिक्रिया झाल्याने इंडिअन मील मॉथचा परिणाम तुलनात्मकरित्या कमी येऊ शकेल. त्याचसोबत मातीचा पोत पूर्ववत करण्याकडेही लक्ष केंद्रित करावे लागेल."

तिसऱ्या श्रोत्याने विचारले, "प्लास्टिक उद्योग नवनिर्मितीसोबत जुन्या वापरलेल्या प्लास्टिकवर प्रक्रिया करून उपयोगात आणले जाते. तरी तुमचा हा उपाय पुन्हा कितपत उपयोगी ठरेल ?"

शारदाने चपखलतेने प्रतिप्रश्न केला, "आपण प्लास्टिक औद्योगिक क्षेत्राशी संबंधित आहात का ?"

ते "हो" म्हणाले.

"ही उपाययोजना प्लास्टिकच्या पुनर्वापर किंवा पुनर्प्रक्रियेचे पर्याय नाही. जे प्लास्टिक सध्या शेतजमिनीवर, संरक्षित क्षेत्रातील मातीत, पर्यटन स्थळं यावरील प्रदूषण कमी करण्यासाठी आहे." तिने समजावले.

चौथा प्रश्न विचारण्यात आला, "पतंगाच्या आळ्यांमध्ये प्लास्टिक पचविण्याची क्षमता असल्याला काय कारण असू शकेल असे तुम्हाला वाटतं ?"

"आळ्यांच्या लाळग्रंथींच्या स्त्रावामुळे किंवा त्यांच्या आतड्यातील काही सहजीवी जीवाणूमुळे ही रासायनिक प्रक्रिया घडते." शारदाने उत्तर दिले.

पाचव्या श्रोत्याने आपली शंका मांडली, "तर मग प्लास्टिक हे या किड्याचे अन्न आहे का ?"

त्यावर शारदा म्हणाली, "नाही. प्लास्टिक

पोलीएथीलीन हे या किड्यांचे नैसर्गिक अन्न ठरू शकत नाही. यांचा प्रादुर्भाव मधमाशांच्या मोहोळाच्या मेणावर होतो. मेण हेसुद्धा नैसर्गिक पोलीमर आहेत.''

अशा प्रकारे श्रोत्यांकडून आलेल्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शारदाने दिली. परिषदेची सांगता होण्यापूर्वी ज्यांनी ज्यांनी आपले शोधनिबंध सदर केले आहेत, त्यांना पारितोषिके मिळणार होती. सर्वोत्तम सादरीकरणाचा पहिला, नाविन्यपूर्ण प्रयोगात पहिला आणि जनहितासाठी संशोधन या तीनही गटामध्ये पहिला क्रमांक असे तीन किताब शारदाच्या नावी झाले. सुवर्ण पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पारितोषक वितरणानंतर शारदाला आपलं मत व्यक्त करण्यास विनंती केली गेली. त्यावर ती सभागृहाला उद्देशून म्हणाली,

''सर्वांना माझा नमस्कार. सर्वप्रथम मी नियोजाकांचे खूप खूप आभार मानते, कारण त्यांनी मला या व्यासपीठावर माझे संशोधन सादर करण्याची संधी दिली आणि श्रोत्यांचेही मन:पूर्वक आभार, कारण त्यांनी माझं बोलणं जाणीवपूर्वक ऐकलं. पारितोषिकांमधून मला समजले की, माझे प्रयोग आणि संशोधन तुम्हा सर्वांपर्यंत पोहोचले. म्हणून अज्ञात परीक्षकांचे धन्यवाद.

''या संशोधनाचे पहिले निरीक्षक आहेत सोलापुरातील एक शेतकरी वडील दामोदर आणि त्यांचा मुलगा शाम. त्यांनीच मला या प्रयोगाची पहिली सामुग्री, संकल्पना आणि प्रेरणा दिली. या प्रसंगाला त्या दोघांनाही मी अत्यंत हृदयपूर्वक नमन करते.

''यापुढील काम जलाशयात म्हणजे गोड्या पाण्याचे स्त्रोत असलेले तलाव आणि नदी तसेच खाऱ्या पाण्याचे स्त्रोत आणि असंख्य सजीवांचे घर म्हणजे समुद्रात झालेल्या प्लास्टिकच्या प्रदूषणाचा नायनाट कसा करता येईल यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. या प्रकारचे प्रयत्न आपण साऱ्यांनी आपापल्या देशात, गावात केले तर एके दिवशी पृथ्वीवर नको असलेले प्लास्टिक, नको असलेल्या ठिकाणावरून नक्कीच संपेल.''

शारदाने आपल्या शब्दांना विराम देताच, टाळ्यांचा पुन्हा कडकडाट झाला. सभागृहातील प्रत्येकाने शारदाला उभे राहून शुभेच्छा दिल्या. तिने भारत देशाचे नाव संशोधन क्षेत्रात मोठे केले. तिने कृषी क्षेत्राचं, जैविक विज्ञानात दिलेले योगदान अनमोल ठरले.

## - सहा -

स्वदेशी परतेपर्यंत या यशोगाथेची सगळीकडे वार्ता झाली. दूरचित्रवाणी, आकाशवाणी आणि वर्तमानपत्रात शारदाचे कौतुक ऐकायला मिळत होते. प्रदूषण नियंत्रण विभागाकडून शारदाच्या संशोधनाची विशेष दखल घेतली गेली. राज्य शासनाकडूनही तिला गौरवण्याची घोषणा झाली.

सोलापूरला येताच तिने दामोदर काकांचे घर गाठले. मावळतीची वेळ होती, कृषी खात्याची गाडी दामोदरच्या घरासमोर आली. दामोदरने शारदाला गाडीतून उतरून येताना पाहिले आणि म्हणाला, ''नमस्कार बाई, आज येवढ्या उशिरा येनं केलं, काय झालं काय गडबड हाय का ?''

''गडबड काही नाही, आज मी तुम्हाला आवर्जून भेटायला आले.''

''या की या, पर तुमी ती कुठं दुसऱ्या देशात जातव म्हणून म्हणलं हुत.''

''हो काका, मी जाऊन आले. तिथे मी संशोधनाचं सदरीकरण केले. ते सर्वांना आवडलं.''

''असं व्हय.''

''मला बक्षिसपण मिळालं.''

''आर वा वा वा ! लई भारी काम केलं बघा तुमी. यवड्या सातासमींदरापार जावून बक्षिस आणलं !''

''पण काका या यशामागे मला तुम्ही आणि

शामने खूप मदत केली आहे.''

''हामी ?'' दामोदर आश्चर्याने पाहत प्रश्न केला.

सुवर्णपदक दामोदरच्या हातात ठेवत शारदा उत्तरली. ''हो, तुम्ही मला वेळोवेळी माहिती पुरवली, शेतात, रानावनात किड्यांची माहिती सांगितली म्हणून तर मी हे सगळं करू शकले. याचं श्रेय तुम्हाला तर जातंच.''

दरवाज्यात उभारलेल्या सुमित्राने शारदाकडे मातृत्वाने पाहिले, तिचे डोळे पाणावले.

हात समोर करत दामोदरने सुमित्राला इशारा केला. सुमित्रा शारदाच्या जवळ आली. शारदाने त्यांना नमस्कार केला. दामोदरच्या हातातले पदक घेऊन सुमित्राने शारदाला घातले. मायेने दोन्ही हात शारदाच्या गालावर फिरवत म्हणाली, ''आई बापाचं नाव कमावलं गं बाई पोरीनं.'' शारदाच्या डोळ्यांत अश्रू तरंगले.

''शाम कुठे आहे ?'' शारदाने डोळे पुसत विचारले. ''मी त्याच्यासाठी एक खास भेट वस्तू आणली आहे युरोपातून.''

''असं ! काय ?'' सुमित्राने विचारले.

''नाही, मी त्यालाच सांगणार आणि त्यालाच देणार.'' शारदा म्हणाली.

''बरं बरं त्यो शेतात अशील बघा आता'' दामोदर म्हणाला.

घरासमोरचं वातावरण भावानिकतेने, आश्चर्याने, अभिमानाने आणि हास्याने प्रफुल्लीत झाले. गाडी शेतावर गेली. तेथे पोहोचल्यावर शारदा शामकडे पाहत होती. तो झाडामध्ये काहीतरी शोधत असल्याचं तिला समजले. लंडनहून आणलेली मधाची बाटली पाठीमागे लपवून तिने शामला विचारले,

''शाम, काय पाहतोय झाडात ?''

''म्हळ'' शाम उत्तरला.

''मध हव आहे तुला ?''

''व्हय, मला लई आवडतंय.''

''हे बघ मी काय आणलंय.''

''हा !'' शाम आश्चर्यचकित झाला. तोंड आ वासून त्या बाटलीकडे बघू लागला. ती जड असल्याने दोन्ही हाताने त्याने त्याला सावरले.

''मला आनलाव ?'' शामचा विश्वासच बसेना.

''होय हे सर्व मध तुझ्यासाठीच आहे.'' शारदाने समाधानकारक चेहऱ्याने शामकडे पाहिले.

शामला खात्री पटली. दोघांनीही तो आनंद मधाच्या गोडव्याने व्यक्त केला.

**– राघवेंद्र श्रीकृष्ण वंजारी**
७१, थोबडे वस्ती, देगाव रोड,
सोलापूर ४१३००१.
मोबा. : ९०२८७६९१८२

### शाहीर अण्णा भाऊ साठे

अनिष्ट धर्माच्या आचरणाने माणसांना हीन समजणे, हा धर्म नसून रोग आहे.

### भगवान महावीर

लाखो शत्रूंवर विजय मिळवण्यापेक्षा स्वत:वर विजय मिळवणे हे केव्हाही चांगले असते.